Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ४, अंक २८] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ९-१५, २०१८/श्रावण १८-२४, शके १९४० [पृष्ठे २३, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना.वि.पु.), म.शा.रा., अ. क्र. ९७.

### आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून

क्रमांक चंशमनपा-आयुक्त-वै.अ.(स्व.)-उपविधी-२०१८-११४५-२०१८.—

चंद्रपूर शहर महानगरपालिकेची महासभा दिनांक २८ मार्च २०१८ रोजी पार पडली. सदर महासभेत ठराव क्रमांक १०१ अन्वये स्वच्छता उपविधी २०१८ ला मंजुरी प्रदान करण्यात आली. ती उपविधी पुढीलप्रमाणे.—

### चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर सार्वजनिक स्वच्छता उपविधी-२०१८

**(१) व्याख्या :–** संदर्भानुसार अथवा काही प्रतिकूल नसल्यास या उपविधित.—

(१) **" चंद्रपूर शहर महानगरपालिका "** म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, खाली प्रस्थापित करण्यात आलेली चंद्रपूर शहर महानगरपालिका.

(२) **" आयुक्त "** म्हणजे चंद्रपूर शहर महानगरपालिका, आयुक्त.

(३) **"उपविधी "** म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, कलम ४५८ खाली तयार करण्यात आलेले सार्जनिक स्वच्छता विभाग उपविधी २०१८.

(४) **" अभिकरण/अभिकर्ता/कंत्राटदार/सेवापुरवठादार "** म्हणजे महापालिका आयुक्तांनी महानगरपालिकेच्यावतीने कचरा गोळा करणे, आकार/कर गोळा करणे, विलगीकरण, प्रक्रिया, विल्हेवाट यासारखी कर्तव्ये किंवा कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त किंवा प्राधिकृत केलेली संस्था/व्यक्ती.

(५) **" सार्वजनिक जागा "** याचा अर्थ, सार्वजनिक वापरासाठी आणि वहिवाटीसाठी खुली असणारी अशी कोणतीही जागा त्यात मार्ग, रस्ता, बाजार, घराची पन्हळ/पाणंद किंवा वाट यांचा-मग ते रहदारीचे स्त्रोत असोत किंवा नसोत यांचा जेथे लोकांना प्रवेश करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. किंवा जेथे थांबविण्याचा लोकांना अधिकार आहे किंवा ज्यावरून त्यांना ये-जा करण्याचा अधिकार आहे. असे प्रवास स्थानक/थांबा (लॅन्डींग प्लेस) यांचा समावेश होतो.

(६) **" सार्वजनिक रस्ता "** म्हणजे सर्वसाधारणपणे लोक किंवा त्यांचा कोणताही भाग वापरणारे रस्ते, मार्ग हमरस्ते किंवा इतर कोणतीही जागा (ती हमरस्ता असेल किंवा नसेल) आणि त्यामधून लोकांना इतर ठिकाणी पोहोचण्याचा हक्क असेल.

(७) **" जैविक विघटनशील/ओला कचरा "** म्हणजे महापालिकेच्या हद्दीत निर्माण झालेल्या खालील प्रकारचा कचरा झाडे व प्राण्यापासून होणारा ओला कचरा, स्वयंपाक घरातील कचरा, उदा. चहा पत्ती, अंड्याची टरफले, भाज्यांची देठे आणि साल, मटन आणि हाडे, पाचोळा आणि बागेतील इतर कचरा (फांद्या, पाने, सुकलेली फुले), प्राण्यांची विष्ठा, ओले कागद, घरातील इतर कचरा, नारळाच्या करवंड्या, राख इत्यादी. जैविक विघटनशिल

नागरी घनकचरा निर्माण करणा-यांकडून त्याचे खत करण्यात आले नाही तर, त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा आणि अशा प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा घंटागाडीत किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघटनशिल कचरा संकलित करणा-या वाहनात किंवा संबंधित अधिकारी यांनी अधिसूचित केल्याप्रमाणे चंद्रपूर महानगरपालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे याची खातर जमा करावी.

(८) **" जैववैद्यकीय कचरा "** म्हणजे अशा प्रकारचा कचरा पुढील स्त्रोतापासून निर्माण होतो. माणसाचे किंवा प्राण्यांचे, निदान, उपचार किंवा प्रतीशमन यांच्याशी निगडीत संशोधन कार्य किंवा संस्थेतील जैविक पदार्थांचे उत्पादन किंवा चाचणी अशा संस्थांत रुग्णालये, खाजगी रुग्णालये, चिकित्सालये, दवाखाने, पशुवैद्यकीय संस्था, प्राणीगृह, विकार वैज्ञानिक प्रयोगशाळा, रक्तपेटी इत्यादींचा समावेश होतो. या प्रकारच्या कच-याची आणखी वर्गवारी जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६ मध्ये दिली आहे.

(९) **" जैविक पंकवायुकरण "** (बायोमिथेनेशन) म्हणजे नियंत्रित प्रक्रिया ज्यामध्ये जैविक कच-याचे सूक्ष्म जिवांच्या माध्यमातून (एन्झायमेटिक) विघटन करून पंकवायु (मिथेन वायुचे ) प्रमाण जास्त असणारा जैववायु (बायोगॅस) तयार करण्यात येवून (हा बायोगॅस वातावरणात सोडण्यास परवानगी नाही.) याचा वापर ऊर्जा निर्मितीकरिता केला जातो.

(१०) **" अधिकांश (घाऊक) घनकचरा उत्पादक "** म्हणजे गृहनिर्माण संकुलातील मालक, भोगवटदार किंवा मालक आणि भोगवटदार यांचे प्रतिनिधित्व करणारी इतर कोणीतीही व्यक्ती, उपहारगृहे, विश्रामगृहे (हॉटेल) बाजार, कंपनी, कॅन्टीन, वसतीगृहे, कॉलेज कॅन्टीन, औद्योगिक वसाहती, क्लब्स् व्यायामशाळा (जिमखाने), विवाह दालने, मनोरंजन/करमणूक संकुल, रुग्णालये इस्पितळे, शैक्षणिक संस्था, वाणिज्य आस्थापना ज्यांचे सरासरी कचरा निर्मिती दर १०० किलो प्रति दिन पेक्षा जास्त आहे. विशेषतः ओळखले जाऊ शकते आणि याद्वारे महापालिका आयुक्त अथवा आयुक्तांकडून नियुक्त कोणत्याही सक्षम अधिकारी असे करण्याची शक्ति प्रदान केलेल्या सक्षम प्राधिका-याने शोधून काढलेली आणि अधिसूचित केलेली व इतर विशिष्ट आस्थापना, स्त्रोत/जागा.

(११) **" मोठी उद्याने आणि उद्यानविद्या कच-यामध्ये "** खालील कच-याचा समावेश होतो. उद्यान, बाग, वाहतूक इ. मधून निर्माण झालेला कचरा आणि त्यामध्ये गवताच्या काड्या, तृण लाकडी तपकिरी कार्बनचा मोठ्या प्रमाणात समावेश असलेल्या वस्तू, उदा. झाडाचा कापलेला भाग, फांद्या, डहाळया लाकडाचे तुकडे, वाळलेली गवत, वाळलेली पाने, भुसा यांचा समावेश होतो आणि ज्यांचा दैनंदिन जैविक-विघटनशिल कचरा गोळा करण्याच्या प्रणालित समावेश होऊ शकत नाही.

(१२) **" गोळा करणे "** म्हणजे एखाद्या ठराविक ठिकाणचा किंवा महानगरपालिकेच्या हद्दीतील कोणत्याही ठिकाणचा जमा झालेला/केलेला कचरा गोळा करून त्याचे वहन करणे.

(१३) **" मुर खतकरण "** (कंपोस्टींग) म्हणजे सुक्ष्मजीव/गांडूळ यांचा उपयोग करून विघटनशिल कच-याचे खतामध्ये रुपांतर करण्याची प्रक्रिया.

(१४) **" अभिकरण/अभिकर्ता /कंत्राटदार/सेवापुरवठादार "** म्हणजे महापालिका आयुक्तांनी महानगरपालिकेच्यावतीने कचरा गोळा करणे, आकार/कर गोळा करणे, विलगीकरण, प्रक्रिया, विल्हेवाट यासारखी कर्तव्ये किंवा कार्येपार पाडण्यासाठी नियुक्त किंवा प्राधिकृत केलेली संस्था/ व्यक्ती.

(१५) **" बांधकाम आणि इमारत पाडण्यामुळे निर्माण झालेला कचरा "** म्हणजे अशा प्रकारचा कचरा बांधकाम, पुनर्रचना, दुरूस्ती आणि घर, व्यापारी इमारती आणि इतर संरचना पाडण्यामुळे निर्माण होतो. त्यामध्ये पुढील प्रकारच्या कच-याचा समावेश होतो.

(अ) मुख्य घटक सिमेंट कांक्रीट, विटा, सिमेंट प्लास्टर, स्टिल,(आर.सी.सी.) दरवाजा/खिडक्या यांच्या चौकटी, छपराचा टेकू, जिन्ह्याचा कठडा, इ. यामधील दगडविटांचे फुटके तुकडे, दगड, [संगमरवर, कणाश्म (ग्रॅनाइट) वालुकाश्म इत्यादी], टिंबर/लाकुड (विशेषतः जुन्या इमारती पाडण्यातून निर्माण झालेले, छपराचे साहित्य)

(ब) किरकोळ घटक (वाहक, लोह, सुघट्या प्लास्टिक) नळ, नळे (पाईप्स) (जी.आय, लोह, प्लॉस्टीक) विद्युत आणि नळ बसविण्याची/ दुरूस्तीची साधने, पॅनल्स (लाकडी, लॅमिनेटेड) इतर कचरा (चकाकणा-या फरशा, काचेची तावदाने).

(१६) **" विल्हेवाट "** म्हणजे महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याची जमिनीचे, पाण्याचे, पृष्ठभागावरील पाण्याचे प्रदूषण रोखून आणि सभोवतालच्या हवेची गुणवत्ता कायम राखून करावयाची विशिष्ट उपाययोजना म्हणून अंतिम विल्हेवाट लावणे.

(१७) **" प्रत्येक घरातून संकलन करण्याची प्रणाली "** म्हणजे घनकच-याचे प्राथमिक संकलन करण्यासाठी महानगरपालिकेने पुरविलेले घंटा वाजणारे वाहन (त्यामध्ये ट्रॅक्टर, टेंम्पो, व्हॅन, व्हिल बॅरा, ढकलवागाडी, सायकल रिक्षा, ऑटो रिक्षा, मोटार वाहन आणि रस्त्यावर वापरण्यात येणारे किंवा वापर करण्याची क्षमता असणारे चाकाचे वाहन यांचा समावेश होतो) व कचरा वेचकांमार्फत घरोघरीचा कचरा संकलनाकरिता अस्तित्वात असलेली प्रणाली.

(१८) **" सुका कचरा "** म्हणजे जैविक विघटन होऊ शकणारा घनकचरा, पालापाचोळा या जैविक घनकचरा व्यतिरिक्त, घरातील/धंद्याच्या जागेतील/दुकानाच्या जागेतील कचरा, मात्र यात राज्य शासनाने वापरासाठी प्रतिबंध केलेल्या व पुनर्निर्माणासाठी उपयोगी नसलेल्या प्लास्टिक समावेश असणार नाही.

(१९) **" निर्माते "**

(१) या उपविधीच्या दृष्टीकोनातून कोणत्याही जागेचा मालक, ताबेदार, अध्यक्ष, सचिव, संचालक, विश्वस्त, नियंत्रक आणि व्यवस्थापक किंवा पुढील लक्षित गटांसाठी कारभार सांभाळणारी, नियंत्रण करणारी किंवा पाहणारी व्यक्ती ही कचरा निर्माता मानली जाईल.

(२) पुढे दिलेल्या प्रकाराची नावे आणि व्याख्या परिपूर्ण नसून महापालिका आयुक्त किंवा त्यांनी नेमलेले अधिकारी यात बदल/सुधारणा करू शकतील. मा. आयुक्त किंवा असे अधिकारी कोणती व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह कोणत्या प्रकारात समाविष्ट असेल ते अधिसूचित करतील. याबाबत कच-याचे स्वरूप, मोजमाप किंवा निर्मित्यांच्या गटात कोणत्या निर्मात्यांचा समावेश हे निश्चित करतील.

(३) कचरा निर्मात्यांचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.–

**(अ) घरगुती :**

१. वैयक्तिक व्यक्ती/वैयक्तिक घर

२. बंगले, बहुमजली भवने, सदनिका, बैठ्या घरांची रांग, भाडोत्री घरे, निवासी संकुले, कृत्रिम गावे, सरकारी आणि खाजगी वसाहत, सहकारी गृहरचना संस्था.

३. झोपडपट्ट्या आणि चाळी.

**(ब) व्यावसायिक :**

४. विश्रामगृहे, उपाहारगृहे, खाद्यगृहे, विवाह कार्यालये, व्यापार मेळावे, मेजवानी हिरवळी, सामाजिक सभागृहे, मनोरंजन केंद्रे, उद्योग व घरगुती उद्योग इ.

५. दुकाने, कार्यालये आणि अन्य व्यापारी आस्थापना, लोहमार्ग स्थानके (रेल्वे), विमानस्थळे, सार्वजनिक सुविधा, सरकारी कार्यालये/विभाग इ. उद्योग.

६. रस्त्यावरील विक्रेते, भाजीची दुकाने/टप-या, फळ व फुलांचे बाजार, मांस आणि मासे विक्रीचे गाळे.

७. कत्तलखाने आणि मांस-मासळी बाजार.

८. बांधकाम स्थळे/बांधकाम व पाडकाम कचरा निर्माते.

**(क) अन्य :**

९. शैक्षणिक संस्था, वारसा स्थळे, धार्मिक संस्था आणि तत्सम पर्यटन स्थळे, जनतेची आकर्षण स्थळे.

१०. दवाखाने आणि औषधे तसेच रासायनिक मिश्रणे याचा व्यवहार करणारे रुग्णालये व अन्य आरोग्य निगा संस्था.

११. सार्वजनिक व खाजगी उद्याने.

१२. दुग्धशाळा व जनावरांचे गोठे.

१३. कार्यशाळा व वाहन दुरूस्ती केंद्रे.

(२०) **" धोकादायक कचरा "** म्हणजे यामध्ये भौतिक, रासायनिक, क्रियाशील ज्वलनशिल स्फोटक किंवा संक्षारण गुणधर्मामुळे आरोग्याला किंवा पर्यावरणाला धोका निर्माण करणा-या किंवा करू शकणा-या स्वतंत्रपणे किंवा इतर कचरा किंवा पदार्थ यांच्या समवेत कच-याचा समावेश होतो. यामध्ये धोकादायक (व्यवस्थापन, हाताळणी आणि ट्रान्सबाउन्ड्री मुव्हमेंट) कचरा नियम २०१६, मध्ये उल्लेख केलेल्या धोकादायक कच-याचा देखील समावेश होतो. प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा धोकादायक कचरा साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारीत करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाद्वारे साप्ताहिक/ठराविक कालावधीने पुरविण्यात येणा-या संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र सरकार किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून अनिवार्य करण्यात आल्याप्रमाणे अशा कच-याची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरिता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे.

(२१) " **निष्क्रिय कचरा** " करणे यात अशा कच-याचे समावेश असेल की, ज्याचे भौतिक, रासायनिक, जैविक गुणधर्म लक्षात घेता तो कचरा आरोग्यपूर्ण भू-भरणासाठी सुयोग्य असेल.

(२२) " **कचरा वेचक** " म्हणजे स्वतंत्रपणे/थेटपणे अथवा संस्थेद्वारे रोजंदारीवर असून अथवा नसून पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण करता येणारा घनकचरा स्त्रोत, रस्ते, कचरा कंटेनर, साहित्य पुनर्प्राप्ती केंद्र, घनकचरा विल्हेवाट केंद्र या ठिकाणाहून गोळा करून त्याचे वर्गीकरण करून पुनर्चक्रिकरणाकरिता देणा-या आणि घनकचरा हाताळणी, स्वच्छता, कंपोस्टींग अथवा बायोगॅस प्रकल्पांची देखभाल करणा-या व्यक्ती.

(२३) " **लँडफिल/भूमीभरण** " याचा अर्थ, भूजल, भूपृष्ठजल प्रदूषित होवू नये तसेच हवेतून धुलीकरण इतस्ततः पसरू नयेत, वा-याने कचरा अस्ताव्यस्त पसरू नये, उपद्रवी किटकांचा किंवा उंदरांचा त्रास होवू नये, हरितगृह (ग्रीनहाऊसमधून) होणा-या उत्सर्जित वायुमुळे हानी पोचू नये, जमीन ओबडधोबड होवू नये व तिची झीज होवू नये या दृष्टीने संरक्षक उपाय योजून तयार करण्यात आलेल्या सुविधांद्वारे जमिनीवर अवशिष्ट घन कच-याची विल्हेवाट लावणे, असा आहे.

(२४) " **कचरा अस्ताव्यस्त टाकणे** " म्हणजे मंजूर केलेले पात्र किंवा कचरा हाताळणी सुविधा म्हणून महापालिकेने निश्चित केलेले इतर कोणतीही जागा किंवा कचरा विल्हेवाट सुविधा या व्यतिरिक्त इतर ठिकाणी ठेवण्यात आलेला कचरा अशा पध्दतीने टाकणे की, ज्यामुळे कचरा पडेल, उतरेल, उडून जाईल, झिरपेल अन्यथा निसटले किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा पडण्यासाठी, उतरण्यासाठी, उडून जाण्यासाठी, वाहून जाण्यासाठी, झिरपण्यासाठी किंवा निसटण्यासाठी कारणीभूत ठरेल, मोकळीक किंवा मुभा दिली जाईल.

(२५) " **बाजार** " या संज्ञेत ज्या कोणत्याही जागेत गुरेढोरे किंवा गुराढोरांसाठी अन्न किंवा मांस, मासळी, फळे, भाजीपाला, माणसाने खाण्यासाठी असलेले अन्य कोणतेही पदार्थ याची विक्री करण्याकरिता किंवा ती विक्रीसाठी ठेवण्याकरिता लोक जागेच्या मालकाच्या संमतीने किंवा संमतीवाचून एकत्र जमतात, त्या जागेचा समावेश होतो, मग तेथे विकत घेणा-या व विकणा-या व्यक्ती एकत्र जमन्यात कोणताही सामान्य विनिमय नसला तरी हरकत नाही आणि अशा जागेच्या मालकाकडून किंवा कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येत असो वा नसो.

(२६) " **भोगवटदार** " म्हणजे या संज्ञेत पुढील व्यक्तिंचा समावेश होतो.

(अ) ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भाडे दिले जाते किंवा देण्याजोगे असते अशा भाड्याचा कोणताही व्यक्ती मालकास त्यावेळी देत असेल किंवा देण्यास पात्र असेल अशी व्यक्ती.

(ब) आपल्या जमिनीवर किंवा इमारतीत राहणारा किंवा अन्यथा तिचा वापर करणारा मालक.

(क) भाडे माफ असलेला भाडेकरी.

(ड) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करिता असलेला लायसन्सधारक, आणि

(इ) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर व भोगवटा केल्याबद्दल मालकास नुकसानभरपाई देण्यास पात्र असलेली कोणतेही व्यक्ती.

(२७) " **सुविधा कार्यरत करणारी व्यक्ती** " म्हणजे नगरपालिका घनकचरा गोळा करणे, साठवण करणे, वाहतूक करणे, प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावणे यासाठी असलेल्या सुविधांची असलेली मालक किंवा अशा सुविधा कार्यरत करणारी व्यक्ती आणि त्यामध्ये महानगरपालिका प्राधिका-यांनी संबंधित क्षेत्रातील नगरपालिका घनकच-याचे व्यवस्थापन करण्यासाठी नियुक्त केलेले इतर कोणतेही अभिकरण यांचा समावेश होतो.

(२८) " **उगमस्थानीचे संकलन** " म्हणजे थेट इमारती किंवा इमारतीच्या समूहातील सामाईक जागा/प्रवेशद्वारे/घराचे दार/सार्वजनिक रस्त्यावरील प्रवेश बिंदु/या उपविधींनुसार निर्देशित केलेले प्रवेशबिंदु/महापालिका आयुक्त अथवा नियुक्त सक्षम अधिकारी यांनी निर्देशित केलेल्या जागांपासून वर्गीकृत कच-याचे पुणे महानगरपालिकेतर्फे संकलन, या व्याख्येत प्रत्येक घरातील कचरा गोळा करणे किंवा आयुक्तांमार्फत अधिसूचित केलेल्या जागेला " प्राथमिक संग्रह बिंदु " आणि संकलन प्रणालीला " प्राथमिक संकलन " म्हणून संबोधता येईल.

(२९) " **विलगीकरण** " महानगरपालिका घनकच-याचे जैविक विघटनशिल, धोकादायक, जैविक-वैद्यकीय, बांधकाम आणि पाडापाड, उद्यान आणि उद्यानविद्यान आणि इतर सर्व प्रकारच्या कच-याचे विलगीकरण ह्या उपविधीत नमूद केल्याप्रमाणे करणे.

(३०) " **प्रक्रिया** " म्हणजे या प्रक्रियाद्वारे घनकच-यावर पुनर्चक्राकन किंवा भूभरणीसाठी योग्य बनविण्याकरीता, उपचार केले जातात अशी कोणतीही शास्त्रोक्त प्रक्रिया.

(३१) " **पुनर्चक्रिकरण** " म्हणजे विलगण केलेल्या आणि जैविक विघटन होऊ न शकणा-या घनकच-याचे नवीन वस्तू तयार करण्यासाठी, ज्यांचे मूळ वस्तूशी साम्य असेल किंवा नसेल अशा कच्च्या मालात रूपांतर करणे.

(३२) " **सॅनेटरी कचरा** " म्हणजे वापरलेले सॅनिटरी नॅपकिन, पंचे, टॉवेल, कंडोम, डिस्पोजेबल डायपर आणि असंयमित क्रियांकरीता वापरले जाणारे पॅड/पत्रके व तत्सम कचरा (या उपविधीद्वारे अथवा पुणे महानगरपालिकेने वेळोवेळी सूचित केलेनुसार अथवा अस्तित्वात असणा-या इतर कायद्याद्वारे निर्देशित केल्यानुसार सदर कचरा विल्हेवाटीआधी योग्यप्रकारे आवेष्टित केला जाईल).

(३३) **“ घनकचरा ”** महानगरपालिका हद्दीत निर्मित वा बाहेरुन आणलेला स्वच्छतासंबंधी कचरा व्यापारी/घरगुती/औद्योगिक कचरा, अन्नपुरवठा सेवा (केटरींग) व बाजारातील कचरा, अन्य घरगुती नसलेला कचरा रस्त्यावरील झाडकाम कचरा, पृष्ठभागावरील गटारांमधून वेगळा केलेला किंवा गोळा केलेला गाळस्वरुप कचरा, फळबाग कचरा, शेती व दुध व्यवसायातील त्याच्या पदार्थांचा कचरा, प्रक्रिया केलेल्या जैववैद्यकीय पदार्थांचा कचरा अशा प्रकारच्या कच-यासह घन स्वरुप किंवा निम घनस्वरुप कच-याचा यात समावेश असेल पण घातक कचरा, प्रक्रियेविना राहीलेला जैववैद्यकीय कचरा, विद्युतघट (बॅटरी) कचरा, किरणोत्सर्गी (रेडिओॲक्टीव) कचरा आणि वी-कचरा (ई-कचरा) यांचा समावेश असणार नाही. जैविक/अजैविक/स्थिर अशा वेगवेगळ्या उद्योगातून, प्रक्रियेतून तयार झालेला घन किंवा अर्धघनकचरा ज्याचा वापर किंवा पुनर्प्रक्रिया सद्यःस्थितीत करू शकत नाही अशा वस्तू कचरा या संज्ञेत धुळ, राख, विटांचे तुकडे, बागेतील किंवा तबेल्यातील केरकचरा व दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा मलजल नसलेला कोणत्याही प्रकारचा केरकचरा यांचा समावेश होतो. घरकुल/निवासी कचरा-यामध्ये स्वच्छता, दुरूस्ती, छंद, सुशोभीकरण यांसारख्या कृत्यांमुळे तसेच रिकामी पाने, आवेष्टन, कपडे, लिखाणचे कागद, वृत्तपत्रे, साजसामान (फर्निचर) मोडणी यांसारख्या गोष्टींमुळे निर्माण झालेला एक किंवा अनेक कुटुंबातील कचरा.

(३४) **“ कचरा वेचक ”** म्हणजे स्वतंत्रपणे/थेटपणे अथवा संस्थेद्वारे रोजंदारीवर असून अथवा नसून पुनर्वापर व पुनर्चक्रिकरण करता येणारा घनकचरा स्त्रोत, रस्ते, कचरा कंटेनर, साहित्य पुनर्प्राप्ती केंद्र, घनकचरा विल्हेवाट केंद्र या ठिकाणावरून गोळा करून त्याचे वर्गीकरण करून पुनर्चक्रिकरणकरिता देणा-या आणि घनकचरा हाताळणी, स्वच्छता, कंपोस्टींग अथवा बायोगॅस प्रकल्पाची देखभाल करणा-या व्यक्ती.

(३५) **“ विल्हेवाट ”** म्हणजे महानगरपालिका क्षेत्रातील घनकच-याचे, जमिनीचे, पाण्याचे, पृष्ठभागावरील पाण्याचे प्रदुषण रोखून आणि सभोवतालच्या हवेची गुणवत्ता कायम राखून करावयाची विशिष्ट उपाययोजना म्हणून अंतिम विल्हेवाट लावणे.

(३६) **“ नाली ”** या संज्ञेत मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ, दुषित पाणी, घाण, सांडपाणी, पावसाचे पाणी किंवा भूपृष्ठाखालील पाणी वाहून नेण्यासाठी किंवा त्याची व्यवस्था लावण्यासाठी केलेला मलजलवाही बोगदा, नळ, खंदक, गटार किंवा पाट आणि कोणताही हौद, उध्दावन टाकी, मलकुंड किंवा अन्य साधने याचा समावेश होतो. अर्धप्रणाल वायुवीजनाचा दांडा किंवा नळ किंवा त्यांच्याशी संबंध असलेले अन्य उपयंत्र किंवा जोडणीकाम यांचा व कोणताही उत्सर्जक, संपीडीत वात प्रधानवाही, पक्के बंद केलेले मलजल प्रधानवाही आणि कोणत्याही जागेतून मलजल किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ वर काढणारी, गोळा करणारी, काढुन टाकणारी किंवा दूर करणारी खास यंत्रसामग्री किंवा उपकरणसंच यांचा समावेश होतो.

(३७) **“ सांडपाणी ”** म्हणजे घरगुती, बिगरनिवासी संस्थात्मक किंवा औद्योगिक ठिकाणच्या गतीविधीमुळे तयार होणारे द्रव.

(३८) **“ निवडणूक प्रभाग ”** म्हणजे महानगरपालिकेच्या निर्वाचित प्रतिनिधीसाठी निश्चित केलेला भौगोलिक न्यायक्षेत्रात असलेला प्रभाग.

(३९) **“ मालक ”** म्हणजे

(अ) एखाद्या जागेच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा, जी व्यक्ती अशा जागेचे भाडे घेते ती व्यक्ती किंवा उक्त जागा भाड्याने दिली असती तर ज्या व्यक्तीस तिचे भाडे घेण्याचा हक्क झाला असता ती व्यक्ती व तेथील पुढील व्यक्तींचा समावेश होतो.

१. मालकीच्यावतीने असे भाडे घेणारा अभिकर्ता किंवा विश्वस्त.

२. जो धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी असलेल्या कोणत्याही जागेचे भाडे घेतो किंवा अशी जागा याच्याकडे सोपविली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त.

३. उक्त जागेचा कब्जा घेण्यासाठी किंवा तिचा मालक म्हणून हक्क बजावण्यासाठी सक्षम अधिकारीता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक, आणि

४. कब्जे गहाणदार, आणि

(ब) कोणतेही जनावर, वाहन किंवा नाव यांच्या संदर्भात वापरण्या येईल. तेव्हा, त्यामध्ये अशा प्राण्यांचा, वाहनाचा किंवा नावेचा त्यावेळी ताबा असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो.

(४०) **“ प्रदुषण ”** म्हणजे खालील गोष्टीमुळे पर्यावरणात झालेला कोणताही बदल

(अ) पदार्थ

(ब) किरणोत्सर्गी किंवा इतर तरंग किंवा

(क) गोंगाट, वास, धुळ किंवा उष्णता

(ड) कोणत्याही कृतीमधून निर्माण झालेले बदल, त्यामध्ये कच-याची साठवण आणि त्यावरील प्रक्रिया, सेवाबांधणी आणि सेवा पुरविणे (कोणत्याही व्यक्तीने किंवा शासकीय मंडळाने पुरविलेल्या सेवा) अशा प्रकारच्या बदलामुळे मानवी आरोग्य आणि कुशलता नैसर्गिक किंवा मानवाने व्यवस्थापन केलेल्या पर्यावरण प्रणालीची रचना, स्थितीस्थापकता, उत्पादनक्षमता, किंवा मानवासाठी उपयुक्त असलेले पदार्थ यावर परिणाम घडवतात किंवा भविष्यात असा परिणाम घडवू शकतात.

(४१) " **सार्वजनिक आरोग्य** " म्हणजे रोग प्रतिबंध, आर्युमान वाढवणे आणि संघटित प्रयत्न आणि संस्था संघटना आणि खाजगी लोकसमूह, व्यक्ती यांचे माहीतीपूर्ण पर्याय या माध्यमातून आरोग्याला चालना देणे या गोष्टींचे शास्त्र आणि कला आणि त्यामध्ये पर्यावरणीय आरोग्य, आरोग्य अर्थशास्त्र, सार्वजनिक धोरण आणि व्यावसायीक आरोग्य यांचा समावेश होतो.

(४२) " **पुनर्चक्रीकरण** " म्हणजे विलग्ण केलेल्या आणि जैविक विघटन होऊ न शकणा-या घनकच-याचे नविन वस्तू तयार करण्यासाठी, ज्यांचे मूळ वस्तूशी साम्य असेल किंवा नसेल अश्या कच्चा मालात रुपांतर करणे.

(४३) " **मलकुंड** (सेप्टीक टँक) " म्हणजे इमारतीतील सांडपाण्यावर प्राथमिक प्रक्रिया जेथे करण्यात येते अशी पाणीबंद टाकी प्राथमिक प्रक्रिया म्हणजे मळी, वंगण यासारखे पदार्थ यांत्रिकी पध्दतीने सांडपाण्यापासून वेगळे करणे.

(४४) " **सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प** " म्हणजे चंद्रपूर महानगरपालिकेने अधिकृतरित्या उभारलेले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प ज्यामध्ये रांगेमधील टाक्या, गाळण्या, यांचे माध्यमातून प्रदुषित पदार्थ सांडपाण्यातून बाहेर काढण्याची प्रक्रिया केली जाते.

(४५) " **कचरा पुनर्चक्रीकरण कर्ते** " म्हणजे कचरा व्यापारी, भंगार माल किरकोळ विक्रेते, फिरते गुंतवणुकदार आणि पुनप्रक्रिया करणारे व्यक्ती अथवा संस्था, जे वर्गीकरण, विक्री आणि अशा साहित्याची खरेदी व कच-यावर पुनप्रक्रिया करून नवीन वस्तू बनवितात.

(४६) " **जैविक विघटनशील/ओला कचरा** " म्हणजे महापालिकेच्या हद्दीत निर्माण झालेला खालील प्रकारचा कचरा झाडे व प्राण्यांपासून होणारा ओला कचरा, स्वयंपाकघरातील कचरा उदा. चहाची पत्ती, अंड्याची टरफले, भाज्यांची देठे आणि साल, मटण आणि हाडे, पाचोळा आणि बागेतील इतर कचरा (फांद्या, पाने, सुकलेली फुले), प्राण्यांची विष्ठा, ओले कागद, घरातील इतर कचरा, नारळाच्या करवंट्या, राख इत्यादी. जैविक विघटनशील नागरी घनकचरा निर्माण करणा-यांकडून त्याचे खत करण्यात आले नाही तर, त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा आणि अशा प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा घंटागाडीत किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघटनशील कचरा संकलित करणा-या वाहनात किंवा संबंधित अधिकारी यांनी अधिसूचित केल्याप्रमाणे चंद्रपूर महानगरपालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे याची खातरजमा करावी.

(४७) " **जैववैद्यकीय कचरा** " अशा प्रकारचा कचरा पुढील स्त्रोतापासून निर्माण होतो, माणसाचे किंवा प्राण्यांचे रोग, निदान, उपचार किंवा प्रतिशमन यांच्याशी निगडीत संशोधन कार्य किंवा संस्थेतील जैविक पदार्थाचे उत्पादन किंवा चाचणी अशा संस्थेत रुग्णालये, खाजगी रुग्णालये चिकित्सालये, दवाखाने, पशुवैद्यकीय संस्था, प्राणीगृह, विकार वैज्ञानिक, प्रयोगशाळा, रक्तपेढी इ. समावेश होतो. या प्रकारच्या कच-याची आणखी वर्गवारी जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६ मध्ये दिली आहे.

(४८) "**मोठी उद्याने आणि उद्यानविद्या** " कच-यामध्ये खालील कच-याचा समावेश होतो. उद्यान, बाग, वाहतूक, बेटे इ. मधून निर्माण झालेला कचरा आणि त्यामध्ये गवताच्या काड्या, तृण, लाकडी तपकिरी कार्बनचा मोठ्या प्रमाणात समावेश असलेल्या वस्तू उदा. झाडाच्या कापलेला भाग, फांद्या, डहाळ्या, लाकडाचे तुकडे, वाळलेले गवत, वाळलेली पाने, भुसा यांचा समावेश होतो आणि ज्यांचा दैनंदिन जैविक विघटनशील कचरा गोळा करण्याच्या प्रणालीत समावेश होऊ शकत नाही.

(४९) " **ई-कचरा** " म्हणजे उत्पादन, नुतनीकरण व दुरूस्ती प्रक्रियेत कचरा निर्मात्यांनी त्याज्य ठरविलेला कचरा व नाकरलेल्या अशा अशतः किंवा पूर्ण विद्युत तसेच वीजकिय (इलेक्ट्रॉनिक) वस्तु अथवा वस्तुंचे भाग आणि ई-कचरा व्यवस्थापन नियमावली २०१६ व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणा यानुसार ई-कचराच्या व्याख्येनुसार असलेला वस्तुस्वरूप कचरा.

(५०) " **उपद्रव** " म्हणजे ज्याच्या योगे उक्त चक्षुइंद्रियास, घ्राणेंद्रियास, किंवा श्रवणेंद्रियास इजा, धोका, त्रास किंवा पीडा होते किंवा होण्याचा संभव आहे किंवा जे जिवीतास धोकादायक किंवा मालमत्तेस अपायकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे. अशा कोणत्याही कृत्याचा, वर्तनाचा, जागेचा किंवा वस्तुचा समावेश होतो.

(५१) " **उपद्रवशोधक** " म्हणजे या उपविधीचे उल्लंघन करणा-या व्यक्तिकडून चक्रवाढ आकारणी, प्रशासकीय आकार गोळा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांनी नेमलेले महानगरपालिकेचे कर्मचारी.

(५२) " **मोठ्या प्रमाणावर गर्दी होणा-या ठिकाणी फिरती शौचालय व कचराकुंड्यांची आवश्यकता** " म्हणजे

(१) सार्वजनिक मेळावे, सभा, अधिवेशने, यात्रा इत्यादी प्रसंगी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणी जमीन मालकांनी/भोगवटदारांनी / त्या समारंभाच्या/प्रसंगाच्या संयोजकाने फिरत्या शौचालयाची व कचरा कुंड्यांची सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

(२) अशा मेळाव्यासाठी जमणा-या गर्दीच्या प्रमाणात अनुभव लक्षात घेऊन सुविधा उपलब्ध करून घेणे बंधनकारक आहे.

(५३) " **प्लास्टीक बाबत निर्बंध** "

(१) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) च्या तरतुदीनुसार केलेल्या पर्यावरण (संरक्षण) नियम ४ च्या अधिकारात महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरीबॅग) उत्पादन व वापर नियम, २००६ अन्वये राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार किमान विहीत जाडी असलेले नविन प्लास्टीक पुनर्चक्रियत प्लास्टीकच्या पिशव्यांचे उत्पादन करता येणार नाही.

(२) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये प्लास्टीकची आयात, पुरवठा व विक्री करता येणार नाही.

(३) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये कोणत्याही वस्तु प्लास्टीकच्या पिशव्यातून विकता येणार नाही.

(४) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये प्लास्टीकच्या कच-यात समावेश करता येणार नाही.

(५४) **" सार्वजनिक उपद्रव "** म्हणजे कायदा हातात घेवून शिक्षेचा अधिकार स्वतःच्या हातात घेणे, एखादी गोष्ट करण्यासाठी वाटेल त्यास बेकायदा प्रतिबंधित करणे अथवा करवून घेण्यासाठी उपद्रव मूल्य वापरणे अथवा सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही दुर्लक्षित कृतीमुळे उद्‌भवणा-या उपद्रव, किंवा ज्यावरून त्यांना ये-जा करण्याचा अधिकार आहे असे प्रवास स्थानिक/थांबा (लॅन्डिग प्लेस) यांचा समावेश होतो.

(५५) **" इतर प्रतिबंध "**

(१) उपविधीप्रमाणे गोळा करण्यात आलेल्या घनकचराकुंड्यात टाकताना वा गाडीवर नेऊन देताना व वाहतूक करताना त्याचा कोणताही भाग रस्त्यावर, नालीवर व दुस-या कोणत्याही जागेत पडता कामा नये. असा घनकचरा साठवता येणार नाही.

(२) गोळा करण्यात आलेला घनकचरा मालक/भोगवटदार कचरा वाहतूक करताना कंत्राटदार वा इतर कोणत्याही व्यक्तीने जाळता येणार नाही.

(३) घनकच-यातून पुनवापरासाठी योग्य असणा-या वस्तू या बाबतीत महानगरपालिकेने प्राधिकृत केलेली संख्या/व्यक्ती संकलित व वेगळ्या करून त्याचा स्वतःसाठी विनियोग करू शकेल मात्र सुक्या कच-यातून अशा वस्तू शोधण्यासाठी कचराकुंडीतील घनकचरा मोकळ्या जागेवर बाहेर काढता येणार नाही.

कोणत्याही मालकाने/ भोगवटदाराने प्रकरण १२ मधील अधिनियम, कलम १५९ तरतुदी अन्वये लेखी परवानगीशिवाय त्याचा खाजगी नाल्या पावसाचे पाणी वाहून नेणा-या किंवा घाण पाण्याच्या निःसारणासाठी तरतूद केलेल्या योग्य त्या नालीत सोडता येणार नाही.

**(२) या उपविधीत वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा वा शब्द समुहांचा अर्थ खंड (१) मध्ये समाविष्ट नसेल त्याचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो असल्याचे समजण्यात येईल.**

**(३) उपविधीची अंमलबजावणी :-**

(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व क्षेत्रासाठी व शहराबाहेरील परंतु महानगरपालिकेच्या ताब्यातील सर्व क्षेत्रासाठी ते लागू असतील.

(२) चंद्रपूर शहरी महानगरपालिकेतील या उपविधीच्या तरतुदी अंमलात आणण्याचे काम चंद्रपूर शहरी महानगरपालिकेच्या प्राधिका-यांकडे सोपविण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

(अ) महापौर

(ब) आयुक्त

(क) वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता).

(३) वरील अधिकारी किंवा त्यांना प्राधिकृत केलेले पदाधिकारी वा अधिकारी उप-विधीच्या कलम ४५ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागरी घनकचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणी करिता जबाबदार असतील.

(४) ही जबाबदारी पार पाडण्यासाठी संबंधित अधिका-यांनी घनकचरा व्यवस्थापनाची नियोजनबध्द पध्दत विहीत करणे आवश्यक आहे.

**(४) मलमुत्र विर्सजन, थुंकीद्वारे तसेच घनकचरा टाकून सार्वजनिक ठिकाणची जागा दुषित करणे :-**

(१) प्रसाधनगृहाशिवाय इतर कोणत्याही सार्वजनिक जागी/रस्त्यावर मलमुत्र विसर्जन करता येणार नाही.

(२) सार्वजनिक जागा/रस्ते यांचा वापर करणा-या वाहनातून प्रवास करणा-या, तसेच इतर कोणत्याही व्यक्तींना, थुंकीद्वारे तसेच घनकचरा, केरकचरा, कागद, प्लास्टीक, पाण्याच्या बाटला, रस्ते/सार्वजनिक जागा/पदपथावर नेमून देण्यात आलेल्या कचरा कुंड्या व्यतिरिक्त तसेच टांगत्या/स्थिर थुंकदाण्या व्यतिरीक्त इतर ठिकाणी टाकून/थुंकून सार्वजनिक जागा दूषित करता येणार नाही.

(३) ज्या व्यक्तींच्या ताब्यातील चतुष्पाद प्राणी/जनावरे आहेत त्या व्यक्तिंनी त्यांच्या ताब्यातील चतुष्पाद प्राणी/जनावरे यांच्याकडून सार्वजनिक जागेच्या ठिकाणी/रस्त्यावर, पदपथावर मलमुत्र विसर्जन होऊ नये यासाठी योग्य ती काळजी घ्यावी. मलमुत्र विसर्जनाच्या विशिष्ट जागेवर सुरक्षित पिशव्या लावणे बंधनकारक आहे.

(४) सार्वजनिक ठिकाणी प्राणी/जनावरे/गाड्या व इतर वस्तू धुऊन परिसर घाण करता येणार नाही.

**(५) घनकचरा साठवण्याची व विलगीकरणाची तसेच विल्हेवाट लावण्याबाबतचे मालक व भोगवटदाराची जबाबदारी :–**

(१) ओला घनकचरा, पालापाचोळा, धोकादायक घनकचरा, जैविक घनकचरा, डेब्रीज अशा निरनिराळ्या घनकच-यांच्या साठवणुकीची व त्यांच्या विल्हेवाटीची पध्दत महानगरपालिका आवश्यकतेनुसार तसेच क्षमतेप्रमाणे एकत्रित किंवा वेगवेगळे विहीत करित या पध्दतींना योग्य प्रसिध्दी दिली जाईल.

(२) चंद्रपूर शहर महानगरपालिकेने उप-विधीस दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी मान्यता दिल्यानंतर सुका कच-याच्या पुनर्वापरासाठी उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांचे आणखी वर्गीकरण करून त्यानुसार त्यांच्या स्वतंत्र साठवणूकीचे व विल्हेवाटीच्या पध्दतीबाबत आदेश देण्यास महापालिका सक्षम असेल.

(३) महापालिकेच्या हद्दीतील प्रत्येक जागेच्या मालकांवर/भोगवटदारावर त्याचे ताब्यातील/वापरातील (जागा वापरत असली किंवा नसली तरीही) जागेतील कच-याचे विहित करण्यात आलेल्या पध्दतीप्रमाणे वर्गीकरण करून साठवणूक करण्यासाठी स्वतंत्र कचराकुंड्या ठेवणे बंधनकारक राहील व विल्हेवाट लावण्याचे बंधन असेल.

(४) महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारचा घनकचरा घरोघरी जाऊन गोळा करण्याचे विहीत केल्यास घरातील किंवा संस्थेतील कचरा महापालिकेचे कर्मचारी अथवा एजन्सीकडे कचरा विलगीकृत स्वरूपात देणे व साठवणे तसेच विहीत केलेल्या वेळी सुपूर्द करणे जागेच्या मालकावर/भोगवटादारावर बंधनकारक राहील.

(५) घनकचरा जमा करण्यासाठी महानगरपालिकेने ठिकाणे निश्चित करून निरनिराळ्या प्रकारच्या घनकच-यासाठी वेगवेगळ्या रंगाच्या कचराकुंड्यांची व्यवस्था केल्यास, जागा मालक/भोगवटदारांना त्याही कचराकुंड्यात घरगुती/धंद्यातील कचरा टाकण्याची मुभा असेल, मात्र योग्य त्या कुंड्यात घनकचरा वेगवेगळा करून टाकण्याची जबाबदारी संबंधित मालकांवर/भोगवटदारांवर राहील व कचरा कुंड्यात एकत्रित घनकचरा टाकता येणार नाही व याशिवाय कचरा कुंड्याच्या बाहेर कचरा टाकता येणार नाही.

(६) रस्ते, पदपथ, सार्वजनिक बागा, शाळेतील आवार इत्यादी सार्वजनिक जागेवर/गटार (सांडपाणी व्यवस्था) इत्यादीमध्ये घनकचरा टाकता येणार नाही.

(७) दिवाळीतील फटाक्यांचा कचरा, दैनंदिन निर्माल्य, गणेशोत्सवातील, ओला कचरा यांसह सार्वजनिक कार्यक्रम/उपक्रम विशेष कार्यक्रम/प्रसंग या निमित्त्याने जमा होणारा सर्व कचरा योग्य रितीने विभागणी करून, साठवूण या नियमावलीत नमूद केलेल्या उपविधीनुसार किंवा महानगरपालिका आयुक्तांनी अधिसूचित केल्याप्रमाणे तो संबंधिताकडे पोच करणे.

(८) केरकचरा पसरविणे, कचरा उघड्यावर जाळणे, कचरा विभागणी न करणे या बाबींना महानगरपालिका प्रतिबंध करेल आणि घनकचरा व्यवस्थापन बाबतचा कोणताही नियम, अधिमान्यता, मान्यता, प्रमाणके मार्गदर्शक सूचना किंवा या उपविधीचे पालन न करणारे कचरा निर्माते, कर्मचारी, प्रतिनिधी संस्था, चालक यांना शुल्क आकारेल.

(९) जैवीकदृष्ट्याविघटनक्षम पूजा साहित्य, उदा. फुले, पाने, फळे इ. स्वीकारण्यासाठी नदी, तळी, कालवे, डबकी इ. जलसाठ्याजवळील विशिष्ट ठिकाणी किंवा जवळच्या ठिकाणी किंवा जवळच्या ओला कचरा प्रक्रिया केंद्रात कुजखतात (कंपोस्ट) रुपांतर करणे आवश्यक असेल.

**(६) जैविक घनकच-याची विल्हेवाट :–**

(१) जैविक तयार होणा-या प्रत्येक संस्थेचा भोगवटादार/मालक मनुष्य प्राण्यांचा आरोग्यावर तसेच पर्यावरणावर कोणताही परिणाम होऊ न देता अशा घनकच-याची विल्हेवाट लावण्यास पूर्णतः जबाबदार आहे.

(२) वरील (१) मधील संस्था शब्दात रूग्णालय, नर्सींग होम्स, औषधालये, दवाखाने, दंतखाने, पशुवैद्यकीय संस्था, पॅथॉलॉजीकल प्रयोगशाळा, रक्त पेढ्या या अशाच व इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या संस्थांचा समावेश आहे.

(३) त्या घनकच-याची विल्हेवाट लावताना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ व जैविक घनकचरा (व्यवस्थापन/हाताळणी) नियम, १९९८ च्या तरतुदीचे पालन करणे जागेचा भोगवटदार/मालक यांच्या कायदेशीर बंधन आहे.

**(७) प्लास्टीकबाबत निर्बंध :–**

(१) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) च्या तरतुदीनुसार केलेल्या पर्यावरण (संरक्षण) नियम ४ च्या अधिकारात महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरीबॅग) उत्पादन व वापर नियम, २००६ अन्वये राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार किमान विहित जाडी असलेले नविन प्लास्टीक पुनर्चक्रीत प्लास्टीकच्या पिशव्यांचे उत्पादन करता येणार नाही.

(१) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये प्लास्टीकची आयात, पुरवठा व विक्री करता येणार नाही.

(२) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये कोणत्याही वस्तू प्लास्टीकच्या पिशव्यातून विकता येणार नाही.

(३) वरील (१) मधील निर्देशामुळे तसेच या उपविधी अन्वये प्लास्टीकच्या कच-यात समावेश करता येणार नाही.

**(८) भूखंडावर बांधकाम करताना कचराकुंड्यासाठी राखीव जागा ठेवणे बंधनकारक :-**

(१) महानगरपालिकेच्या हद्दीतील ५०० चौ. मी. वा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या भूखंडावर बांधकाम करताना योग्य आकाराच्या क्षेत्रफळाची जागा कचरा साठवणुकीसाठी त्या भूखंडाचे क्षेत्रात राखीव ठेवण्याची मालकाची जवाबदारी आहे.

(२) जागेचे भोगवटदार हे राखीव जागेत महानगरपालिकेने विहीत केलेल्या संकल्पनेनुसार तयार केलेल्या किंवा पुरविलेल्या कचराकुंड्या वापरण्यासाठी जवाबदार आहेत. जागेचा दुस-या कोणत्याही कामासाठी उपयोग झाल्यास अन्य कोणत्याही अधिनियमाच्या/नियमांच्या तरतुदींना बाधा न येता या उपविधीच्या तरतुदीसाठी तो सार्वजनिक उपद्रव समजला जाईल.

(३) मालक/भोगवटादारास कोणत्याही प्रकारचे साहित्य सार्वजनिक जागी/रस्त्यावर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय ठेवता येणार नाही किंवा परवानगी व्यतिरिक्त रस्त्याच्या/सार्वजनिक जागेचा वापर रेती व सिमेंट कालविणे, खडी, विटा, लोखंडी सळ्या, इत्यादी बांधकाम साहित्याच्या साठवणुकीसाठी करता येणार नाही.

(४) मालक/भोगवटदार यांनी बांधकाम साहित्य सार्वजनिक जागी किंवा रस्त्यावर टाकणे, गटारे व नाल्यामध्ये डेब्रीजच्या साठवणूक व विल्हेवाटीबाबतचा भंग.

(५) डेब्रीजचे साठवणुक करणे व योग्य रितीने विल्हेवाट लावण्याची जवाबदारी मालक/भोगवटदाराची आहे. बांधकाम उपविधी व देण्यात येणा-या बांधकाम परवानगीतील तरतूदीन्वये मालक/भोगवटदार यांना बांधकामासाठी निश्चित करून देण्यात आलेल्या सिमारेषेच्या आतच डेब्रीजची व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

**(९) मोठ्या प्रमाणावर गर्दी होणा-या ठिकाणी फिरती शौचालय व कचराकुंड्यांची आवश्यकता :-**

(१) सार्वजनिक मेळावे, सभा, अधिवेशने, यात्रा इत्यादी प्रसंगी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी जमीन मालकांनी/भोगवटादारांनी/त्या समारंभाच्या/प्रसंगाच्या संयोजकाने फिरत्या शौचालयाची व कचराकुंड्यांची सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

(२) सार्वजनिक समारंभ करण्याचा परवाना नसलेल्या कोणत्याही ठिकाणी अथवा सार्वजनिक ठिकाणी शंभर व्यक्तीपेक्षा अधिक व्यक्ती सहभागी असणारा उपक्रम किंवा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी महानगरपालिकेला घटनेच्या किमान तीन कामकाजाचे दिवस आधी त्याची आगामी पूर्वसूचना दिली पाहिजे.

(३) उपक्रम किंवा समारंभ संपल्याच्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत आयोजकांनी संबंधित ठिकाणी निर्माण झालेल्या कच-याचे विलगीकरण व संकलन करून महापालिकेने विहीत केलेल्या वापरकर्ता शुल्कासह असा विलगीत कचरा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून परिसर स्वच्छ करणे बंधनकारक राहील. अशा मेळाव्यासाठी जमणा-या गर्दीच्या प्रमाणात अनुभव लक्षात घेऊन सुविधा उपलब्ध करून घेणे बंधनकारक आहे.

**(१०) खासगी बाजार व कत्तलखान्यात होणारा घनकचरा :-**

(१) अधिनियमाच्या प्रकरण १९ मधील कलम ३२७ व ३३१ (एक) एक च्या तरतुदींन्वये खासगी बाजार व खासगी कत्तलखाना उघडण्यास महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीतील अटींनुसार अशा बाजारात/कत्तलखान्यात निर्माण होणा-या घनकच-याची विल्हेवाट लावण्याची जवाबदारी परवानगी धारकावर आहे.

(२) हाथगाड्या, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते, दुकानदार, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायिक इत्यादी ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण होतो त्या जागेच्या भोगवटदार/मालकावर असा निर्माण झालेला घनकचरा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या जागी स्वखर्चाने वाहतूक करून त्याची विल्हेवाट लावण्याची जवाबदारी आहे.

(३) अशा बाजार/कत्तलखान्यात निर्माण होणा-या घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी यंत्रणा निर्माण करण्याची जवाबदारी परवानगी धारकावर असेल व यंत्रणेत संबंधीचा तपशील मागणी करताच त्याने महानगरपालिकेस पुरविणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे पुरविण्यात आलेल्या तपशिलानुसार यंत्रणा कार्यरत आहे किंवा नाही ते तपासण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे.

